# वाळूमाफिया पुन्हा उठले प्रशासनाच्या जीवावर

सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ७४ | सोमवार, दि. ८ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## चक्क मंडळ अधिकाऱ्याच्या डोक्याला गावठी पिस्तूल लावून जीवे मारण्याची धमकी

**अमळनेर- तालुक्यातील मांडळ येथे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईसाठी गेलेल्या पथकातील मंडळ अधिकाऱ्याला वाळूमाफियांनी डोक्यावर पिस्तूल लावून जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना शनिवार, दि. ७ डिसेंबर रोजी रात्री एक वाजेच्या सुमारास घडली. हा प्रकार म्हणजे वाळूमाफियांची नंगेशाही, गुंडगिरी आणि बेदारकारपणाचा कळस आहे. अर्थात त्यासाठी दस्तुरखुद्द प्रशासनातीलच काही अस्तनीतले साप जबाबदार असल्याची सर्वत्र जोरदार चर्चा आहे. याप्रकारातून गुंडांना प्रशासनासह पोलिसांचाही कोणताही धाक नसल्याचे, ते मनी आणि मसलपॉवरच्या दमवर कोणालाही घाबरत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

तालुक्यातील मांडळ येथे वाळूची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना मिळाली होती. त्यांनी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना कारवाईसाठी पथक पाठविण्याचे आदेश दिले. मंडळ अधिकारी पुरुषोत्तम पाटील, ग्राम महसूल अधिकारी संदीप माळी, जितेंद्र पाटील, मधुकर पाटील, पवनकुमार शिंगारे, दीपक पाटील हे शनिवारी रात्री एकच्या सुमारास मांडळ येथे पांझरा नदीतील गावविहिरीजवळ पोहचले. तेथे त्यांना जेसीबी (एमएच१५, बीडब्ल्यू ९४५९) हे निळ्या रंगाच्या ट्रॅक्टरमध्ये वाळू भरत असताना दिसले. त्यांना वाळू वाहतुकीचा परवाना आहे का ? असे विचारून सर्व वाहने अमळनेर येथे नेण्यास सांगितले. त्यावेळी पाच ते सहा जण तोंडाला रुमाल बांधून मोटरसायकलवर आले. दहा ते बारा जण हातात लाठ्या-काठ्या घेऊन आले. पथकातील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ दमदाटी करू लागले. त्यातील एकाने ग्राममहसुल अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या डोळ्यात स्प्रे मारला. दुसऱ्या एकाने पायावर काठी मारली. एकाने मंडळ अधिकारी पुरुषोत्तम पाटील यांच्या कपाळावर गावठी पिस्तुल लाऊन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर ते जेसीबीसह ट्रॅक्टर घेऊन पसार झाले. याप्रकरणी मंडळ अधिकारी पुरुषोत्तम पाटील यांनी मारवड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून संशयितांवर गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार तपास करीत आहेत.

**"मांडळ येथील घटनेसंदर्भात पोलिसांना कळविण्यात आले आहे. तीन- चार तासांमध्ये आरोपी अटकेत राहतील, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. यासाठी आज दुपारी विविध भागात पथके रवाना करण्यात आली आहेत. सध्या आरोपींबाबत संभ्रम आहे. चौकशी करून सविस्तर माहिती देण्यात येईल.**
**- मयूर भंगाळे, प्रांताधिकारी, अमळनेर.**

**"मांडळ येथील घटनेबाबत गांभिर्याने दखल घेतली आहे. मी स्वत: तपासात सहभागी झालो आहे. दोन पथक आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आले आहे. लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल.**
**- विनायक कोते, पोलीस उपअधीक्षक, अमळनेर.**

### दिनविशेष
०८ डिसेंबर

- दीड वर्षाच्या लढाईनंतर मराठ्यांनी पोर्तुगीजांकडून रेवदंड्याचा किल्ला ताब्यात घेतला.
- भारतातील पहिली डबल डेकर बस मुंबईत धावू लागली.
- सार्क परिषदेची स्थापना झाली.
- रवींद्रनाथ टागोर यांच्या चोरीस गेलेल्या नोबेल पदकाची प्रकृतीची स्वीडन

### आजचे वाढदिवस



सौ. रिताताई बाविस्कर
नेत्या, राष्ट्रवादी काँग्रेस

### देवळीच्या तरूणाचा हृदयविकाराने मृत्यू

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर- तालुक्यातील देवळी येथील नाना भिकन पाटील (वय ४६) या तरूणाचा हृदयविकाराने मृत्यू झाला. ही घटना रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजमता अमळनेर येथील मराठी शाळा क्रमांक एक जवळ घडली.

नाना पाटील हा त्यांचा पुतण्या समाधान विश्वनाथ पाटील यांच्यासोबत अमळनेर येथे आले होते. त्यांचे काम आटोपून दोघे देवळी येथे जाण्यासाठी मराठी शाळा क्रमांक एकजवळील खासगी वाहनांच्या थांब्याजवळ उभे होते. यावेळी नाना पाटरील याच्या छातीत अचानक वेदना झाल्या. समाधान पाटील, सोनू प्रकाश पाटील, बल्लू प्रकाश पाटील व भटू नाना पाटील यांनी त्यांना तातडीने ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान दुपारी ३ वाजता त्यांचा मृत्यू झाला. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमोद पाटील तपास करीत आहेत.

## दै. ग्लोबल महातेजमध्ये खालील प्रसिद्ध बातम्यांची पोलीस व प्रशासनाने दखल घेतली असती तर वरील बातमी प्रसिद्ध करावी लागली नसती...!

### दै. ग्लोबल महातेज ने सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलीली बातमी

## नोटांच्या बंडलांच्या ओझ्याखाली सारे दबले...! त्यामुळेच वाळूमाफिया लईच माजले...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : एका माणसाने एक अजगराचे पिलू पाळले होते. हळूहळू ते मोठे झाले . तो माणूस अजगराच्या पिलावर जिवापाड प्रेम करत होता . नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे अजगर खूपच मोठा झाला आणि अचानक त्याने खाणे-पिणे सोडले . तो त्या मालकाच्या अंगाभोवती रोज तासन्तास वेढा मारू लागला . मालकाला असे वाटले , की हा माझ्यावर खूप प्रेम करतो आहे . अजगराने खाणे-पिणे सोडल्याने मालकाने त्याला डॉक्टरांकडे नेले. त्यावेळी डॉक्टरांनी मालकाला विचारले , की या अजगराने किती दिवसापासून खाणे-पिणे सोडले आहे काय ? त्यावर मालकाने सांगितले की, तीन दिवसांपासून सोडले आहे. तेव्हा डॉक्टर मालकाला म्हणाले की, हा अजगर आता तुलाच खाण्याच्या इराद्यात आहे . पोटात भरपूर भूक व्हावी म्हणून त्याने खाणे-पिणे सोडले आहे. तुला कसे गिळता येईल ? याचा अंदाज**




अगदी हीच गत एके दिवशी वाळूमाफियांचे आका असलेल्या पोलीस, प्रशासन आणि राजकीय क्षेत्रातील सन्माननीय व्यक्तींची होणार आहे . वाळू माफिया त्यांना भरपूर 'माल' देत आहेत. सर्व लाड पुरवीत आहेत. त्यामुळे या मंडळींना वाळूमाफिया गोड वाटतात.

प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणचे वाळूमाफिया उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवरच तलवारीचे सपासप वार करीत आहेत, त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न करीत आहेत , काठ्यांनी झोडपीत आहेत, ट्रॅक्टरच्या खाली त्यांना चेंगरीत आहेत, तोंड फोडून रक्तबंबाळ करीत आहेत , भरचौकात अधिकाऱ्यांची गच्ची धरून शिवीगाळ करीत आहेत. हे कसले लक्षण आहे ? खरेतर यासाठीच बेजबाबदार अधिकारी व पदाधिकारीच मंडळी जबाबदार आहेत. अनेक ठिकाणी ही मंडळी नोटांच्या बंडलाखाली दबली आहे. त्यामुळेच वाळूमाफियांची टोळी आता लईच माजली आहे. सट्टा , मटका हातभट्टी , वाळूमाफियागिरी हे कधीही बंद नव्हते . बंद राहणारही नाही . मात्र या दोन नंबरच्या लाईनीतील लोकांनी गुंडागर्दी करू नये . त्यांच्या औकातीत राहावे . पोलीस आणि प्रशासनासमोर मान वर करू नये . सामान्य नागरिकांना त्रास देऊ नये अशा तंबी देऊन त्यांना सर्व अर्थाने काबूत ठेवणारे पोलीस व प्रशासनातील अनेक अधिकारी होऊन गेले आणि अजूनही असे काही मर्द शिल्लक आहेत . अनेक राजकीय मान्यवरही सर्व क्षेत्रांतील गुंडांना कंट्रोल करण्याबाबत पोलीस व प्रशासनाला सक्त तंबी देत होते व सन्माननीय अपवाद असलेले काही राजकीय मान्यवर अजूनही तंबी देत आहेत. अमळनेरची परिस्थिती आता चिंताजनक झालेली आहे. वाळूमाफिया आता कोणालाच घाबरत नाहीत . सामान्य शहरी नागरिक व ग्रामस्थ खास करून ज्या भागातून रात्री वेळी - अवेळी वाळूचे ट्रॅक्टर व डंपर दनादन आवाज करत सगळ्यांची झोप उडवतात. आधीच निकृष्ट असलेल्या रस्त्यांचे तीनतेरा वाजवतात . त्याबाबत जीवाच्या आकांताने सगळीकडे तक्रारी करतात . सर्व प्रकारचा निडर मीडिया वाळूमाफियांच्या विरोधात सडेतोड बातम्या प्रसिद्ध करतात. मात्र तरीही वाळूमाफियांची दादागिरी, मनमानी आणि मस्ती यात थोडासाही फरक पडत नाही . पोलीस तथा प्रशासनाने जप्त केलेले ट्रॅक्टर ते डुब्लीकेट चावी लावून बिनधास्त घेऊन जातात. तरीही त्यांचे काही होत नाही . याचा नेमका ' अर्थ ' काय होतो ? हा ' अर्थ ' लोकांना कळत नाही अशातला भाग नाही . मात्र ' अतिरेके सर्वत्र वर्ज्यते ' हा सृष्टीचा नियम आहे . लोकांचे रक्षण न करणाऱ्या, कायद्याची पायमल्ली करणाऱ्या गुंडांनी, अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी जेव्हा - जेव्हा अतिरेक केलेला आहे तेव्हा - तेव्हा सामान्य जनता रस्त्यावर उतरते आणि त्यांना सर्वार्थाने उलथवून टाकते . अशी वेळ किमान अमळनेरवर येऊ नये याची सर्व संबंधितांनी वेळीच दखल घेणे गरजेचे आहे. अनेक गावांमध्ये ग्रामसभा घेऊन वाळूमाफियांच्या विरोधात कारवाई करण्यासाठीचे ठराव केले जातात. संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांना तक्रार पत्र दिले जातात. तालुक्यातील मांडळ येथे नुकतीच तलाठ्यांना दमदाटी करण्यात आली. शिवीगाळ करण्यात आली तरीही त्यांचे फार काही झाले नाही. फार काही होईल असे वाटतही नाही. मात्र हा फक्त ट्रेलर आहे . ज्या दिवशी वाळूमाफिया त्यांच्या मग्रुरीचा आणि नंगेपणाचा पूर्ण पिक्चर दाखवतील त्या दिवशी त्यांना विरोध करणारा कोणीतरी नागरिक, अधिकारी किंवा राजकीय नेत्याचा बळी गेल्याशिवाय राहणार नाही. हल्ली नवरात्र सुरू आहे. असुरांचा नाश याच काळात होतो . काही ठिकाणी देवीला बळीही चढवला जातो '. समजदार को इशारा काफी है ' कोण- कोण ? कोणा - कोणाला ? कोठे- कोठे ? काय- काय देतो '? पकडलेल्या ट्रॅक्टरच्या तडजोडी कोण करतात ? त्यांचे रेट काय ? ही सारी काही माहिती ' दैनिक ग्लोबल महातेज 'कडे आहे. त्यामुळेच महातेज इतके स्पष्ट लिहिण्याची हिंमत करीत आहे .

भारतातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाचे नुकतेच अमळनेर येथे राज्यस्तरीय अधिवेशन झाले . त्या अधिवेशनातही अनेक प्रखर, प्रामाणिक व जागरूक पत्रकारांनी अनेक ठिकाणच्या वाळूमाफियांच्या मग्रुरीचे व त्यांच्याकडून पत्रकारांना होत असलेल्या दमदाटीचे किस्से सांगितले . त्यावर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. संदीप काळे साहेब यांनी थेट मुख्यमंत्री व महसूलमंत्र्यांची भेट घेऊन त्यांचे सर्व गैरप्रकारांकडे लक्ष वेधले आहे . भविष्यात वाळूमाफिया असोत की कोणत्याही प्रकारचे अवैध व्यवसाय करणारे असोत त्यांच्या विरोधात बातम्यात प्रकाशित करणाऱ्या एकाही पत्रकाराच्या केसालाही धक्का लागला तर फक्त राज्यातच नव्हे , तर देशभर असे आंदोलन केले जाईल की तशी त्याची दखल परदेशातही घेतली जाईल , असा स्पष्ट इशारा व्हॉईस ऑफ मीडियाने दिला आहे.

### दै. ग्लोबल महातेज ने मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलीली बातमी

## अखेर वाळूमाफियारूपी अजगराने महसूल विभागाचा घेतला जोरदार चावा

### ग्राम महसूल अधिकाऱ्याला ट्रॅक्टरखाली फेकून जीवे मारण्याचा प्रयत्न!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : एका माणसाने एक अजगराचे पिलू पाळले होते. हळूहळू ते मोठे झाले . तो माणूस अजगराच्या पिलावर जिवापाड प्रेम करत होता . नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे अजगर खूपच मोठा झाला आणि अचानक त्याने खाणे-पिणे सोडले . तो त्या मालकाच्या अंगाभोवती रोज तासन्तास वेढा मारू लागला . मालकाला असे वाटले , की हा माझ्यावर खूप प्रेम करतो आहे . अजगराने खाणे-पिणे सोडल्याने मालकाने त्याला डॉक्टरांकडे नेले. त्यावेळी डॉक्टरांनी मालकाला विचारले , की या अजगराने किती दिवसापासून खाणे-पिणे सोडले आहे काय ? त्यावर मालकाने सांगितले की, तीन दिवसांपासून सोडले आहे. तेव्हा डॉक्टर मालकाला म्हणाले की, हा अजगर आता तुलाच खाण्याच्या इराद्यात आहे . पोटात भरपूर भूक व्हावी म्हणून त्याने खाणे-पिणे सोडले आहे. तुला कसे गिळता येईल ? याचा अंदाज घेण्यासाठीच तो तुला खालपासून वरपर्यंत रोज विळखा मारतो आहे .

दै. ग्लोबल महातेजने सोमवार, दि.२९ सप्टेंबर रोजी ' **नोटांच्या बंडलांच्या ओझ्याखाली सारे दबले...! त्यामुळेच वाळूमाफिया लईच माजले...!!**' शिर्षकाखाली बातमी प्रसिद्ध केली होती. त्या बातमीत एका अजगराची गोष्ट सांगितली होती. त्याचा प्रत्यय महसूल विभागाला चोपडा तालुक्यातील बुधगाव येथे आला आहे. या घटनेत अजगराने फक्त जोरदार चावा घेतला आहे. आता तरी महसूल विभागाने स्वतःचे अस्तित्व आणि कायद्याची ताकद वाळू माफियांना दाखवून द्यावी. अन्यथा वाळू माफियारुपी अजगर महसूल विभागातील कोणाला तरी गिळंकृत करेल आणि ढेकरही देणार नाही. असा दूर्दैवी प्रसंग येऊ नये याची महसूल विभागाने आता तरी काळजी घेणे गरजेचे आहे.

वाळू माफियांची दादागिरी सर्वत्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांच्यावर कोणाचाही अंकुश दिसून येत नाही. कारवाई करण्यास गेलेल्या एका महसूल विभागाच्या अधिकाऱ्यालाच त्यांनी ट्रॅक्टरखाली आणून त्यास ठार करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

ग्राममहसूल अधिकारी अनंत माळी बुधगाव येथे नदीपात्रातून वाळू भरून येणारे ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात नेत होते. श्री. माळी हे ट्रॅक्टरवर बसले होते. वाळू माफियांनी त्यांच्याशी वाद घालून तुंबळ हाणामारी झाली. याप्रसंगी त्यांना ट्रॅक्टरच्या मागील चाकाखाली ढकलून देण्यात आले. या घटनेत त्यांचे नशिब बलवत्ती म्हणून अगदी थोडक्यात बचावले आहेत. याप्रकरणी चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, ही घटना चोपडा तालुक्यातील असली तरी अमळनेर तालुक्याच्या वेशीला लागूनच आहे. त्याठिकाणाहून डंपर भरून मोठी वाळू वाहतूक होते. तालुक्यात तापी, पांझरा व बोरी नदीतून चोरटी वाळू वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. महसूल प्रशासनाकडून ट्रॅक्टर, टेम्पो यांच्यावर कारवाई होत आहे. मोठे मासे मोकाट सुटत असल्याने असंतोष निर्माण झाला आहे. बाहेर गावाहून येणारे गावाच्या नदीतून डंपरने वाळू वाहून नेली जाते. कारवाई मात्र गाव परीसरातील ट्रॅक्टरवर केली जात आहे. हाच भेदभाव एखाद्या दिवशी 'देणे- घेणे' करीत असलेल्या महसूल विभागाला घेण्याचे देणे पडल्याशिवाय राहणार नाही.



# क्रांतिकारक मार्गाचे पुरस्कर्ते क्रांतिसिंह नाना पाटील


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्रांतिसिंह नाना पाटील हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे क्रांतिकारक मानले जातात. ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होत. त्यांचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने सांगली सातारा या परिसरामध्ये होते. नाना पाटील यांच्यावर प्रारंभीच्या काळात सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता. पुढील काळात ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीस आव्हान देण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. त्यांची पुण्यतिथी शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी सर्वत्र साजरी झाली.

साताऱ्यातील प्रतिसरकारच्या स्थापनेत क्रांतिसिंह नाना पाटील यांचा वाटा महत्त्वाचा होता. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेणे महत्त्वाचे ठरते. नाना पाटील यांनी साताऱ्यामध्ये प्रतिसरकारची स्थापना करून महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीला मोठे योगदान दिले. भूमिगत चळवळीच्या माध्यमातून त्यांनी प्रतिसरकारची स्थापना केली. प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर ग्रामीण भागात ब्रिटिशांचे अस्तित्व नाममात्र राहिले.

नाना पाटील यांनी युवकांची संघटना स्थापन करून इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान निर्माण केले. प्रतिसरकारचे नेते या नात्याने त्यांनी केलेल्या कार्यामुळेच त्यांना क्रांतिसिंह म्हणून ओळखले जाऊ लागले. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीच्या भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये नाना पाटील यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. या काळामध्ये महाराष्ट्रातील सातारा, सांगली या परिसरात नाना पाटील यांची ब्रिटिशांवर एक मोठी दहशत निर्माण झाली होती. प्रतिसरकार अथवा ' पत्री सरकार ' म्हणून या काळात ते ओळखले गेले. यानंतर नाना पाटील यांनी सातारा सांगली परिसरामध्ये आपले सामाजिक कार्य पुढे चालू त्यांना मोठी लोकप्रियता देखील मिळाली.

महाराष्ट्रात (प्रामुख्याने सातारा, सांगली भागात) स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे, तसेच पत्री सरकार किंवा प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेवाद्वितीय प्रयोग राबवणारे लढवय्ये राजकीय कार्यकर्ते म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होत. नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील येडे मच्छिंद्र या गावी झाला. लहानपणापासूनच नानांना दणकट शरीराचे वरदान लाभले होते. म्हणूनच पुढील काळातही त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वामुळेच लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नानांनी काही काळ तलाठी म्हणून नोकरी केली. पण समाजकारण व



राजकारणाची ओढ असलेले नाना लवकरच नोकरीतून बाहेर पडले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीपासूनच त्यांचा स्वातंत्र्यलढ्यात सहभाग होता. स्वातंत्र्यलढा आणि बहुजन समाजाचा विकास या दोन्ही मार्गांनी त्यांचे कार्य चालू होते.

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीचे कार्य करण्यासाठी नाना पाटील यांनी नोकरीचा त्याग केला. त्यांनी ग्रामीण जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन, जनतेला धाडसी बनवण्याचा प्रयत्न केला. नानांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. तसेच लोकांच्या भाषेत प्रभावी भाषणे करून त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी नानांकडे होती. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होते.

ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभी केली पाहिजे असा नाना पाटील यांचा विचार होता. ' आपुला आपण करू कारभार ' हे सूत्र त्यांनी इ.स. १९४२ च्या चले जाव चळवळीत प्रत्यक्ष अमलात आणले. आपल्या देशाचा कारभार आपणच केला पाहिजे या जाणिवेतून प्रतिसरकार ही संकल्पना नानांनी प्रत्यक्षात आणली होती. प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, अन्नधान्य पुरवठा, बाजार व्यवस्था यासारखी लोकोपयोगी कामे केली जात. ब्रिटिशांची राज्यव्यवस्था नाकारून त्यांनी १९४२ च्या दरम्यान सातारा जिल्ह्यात स्वतंत्र राज्याची स्थापना केली. प्रतिसरकारचा प्रचार ज्येष्ठ कवी ग. दि. माडगुळकर लिखित पोवाड्यांच्या माध्यमातून आणि शाहीर निकम यांच्या खड्या आवाजाद्वारे केला जात होता. नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारमध्ये विविध दलांची स्थापना झाली. त्यातल्या एका दलाचे- तुफान दलाचे- फील्ड मार्शल जी.डी. लाड (बापू) आणि कॅप्टन आकाराम (दादा) पवार होते. ह्या दलाची कुंडल येथे युद्धशाळा होती... या युद्धशाळेतून प्रशिक्षित अशा पाच हजारांवर जवानांच्या दोनशे शाखा स्वातंत्र्यपूर्व काळात गावोगाव काम करीत. तलवारी, जांबिया या परंपरागत हत्याराबरोबरच पिस्तूल बाँबगोळे फेकण्याचे प्रशिक्षण या जवानांना होते. प्रतिसरकारने गावटग्यांवर बसवलेल्या दहशतीमुळे या सरकारची पत्री सरकार अशी ओळख तयार झाली.

या प्रतिसरकारच्या माध्यमातून बाजारव्यवस्था, अन्नधान्य पुरवठा, भांडणतंटे सोडविण्यासाठी लोकन्यायालयांची स्थापना, दरोडेखोरांना- पिळवणूक करणाऱ्या सावकारांना -पाटलांना कडक शिक्षा - अशी अनेक समाजोपयोगी कामे करण्यात येत होती. या सरकार अंतर्गत नाना पाटील यांनी 'तुफान सेना' या नावाने सैन्य दलाची स्थापना केली होती. ब्रिटिशांच्या रेल्वे, पोस्ट आदी सेवांवर हल्ला करून त्यांना नामोहरम करण्याचे तंत्रही नाना पाटील यांनी यशस्वीरीत्या राबवले. १९४३ ते १९४६ या काळात सातारा व सांगली जिल्ह्यातील सुमारे १५०० गावांत प्रतिसरकार कार्यरत होते. या संकल्पनेचा प्रयोग पुढे देशातही अनेक ठिकाणी करण्यात आला. १९२० ते १९४२ या काळात नाना ८-१० वेळा तुरुंगात गेले. १९४२ ते ४६ या काळात ते भूमिगतच होते. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी बक्षीस लावले, जंगजंग पछाडले. पण क्रांतिसिंह ब्रिटिशांना सापडले नाहीत. ते भूमिगत असताना ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली, त्यांची जमीनही सरकारजमा केली. याच काळात त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. क्रांतिसिंहांनी आपला जीव धोक्यात घालून धावपळीत मातोश्रींवर अंत्यसंस्कार केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे नक्की झाल्यावरच क्रांतिसिंह कऱ्हाड तालुक्यात प्रकट झाले. त्ययांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा तसेच राजर्षी शाहूंच्या कार्याचा प्रभाव होता. त्यांनी 'गांधी -विवाह' ही अतिशय कमी खर्चात विवाह करण्याची पद्धत रुजवण्याचा प्रयत्न केला. तसेच शिक्षण प्रसार, ग्रंथालयांची स्थापना, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामीण जनतेची व्यसनमुक्ती या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्यामुळे शाहीर निकम, नागनाथअण्णा नायकवडी यांसारखे कार्यकर्ते घडले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रामुख्याने सांगली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सातत्याने प्रकाशात असणाऱ्या क्रांतिसिंहांचे ६ डिसेंबर १९७६ रोजी वाळवामध्ये निधन झाले. मला वाळव्यामधेच दहन करण्यात यावे, ही त्याची इच्छा होती. त्यानुसार वाळव्यामधेच दहन करण्यात आले. अशा या प्रेरक व्यक्तिमत्त्वास दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे भावपूर्ण अभिवादन..!

# स्मृती मानधना-पलाशचे लग्न मोडले!

## स्मृतीने स्वतःच केले जाहीर; इन्स्टाग्रामवरील लग्नासंबंधित फोटो, व्हिडिओही डिलीट



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीयहिला संघाची उपकर्णधार स्मृती मानधना व सिने संगीतकार पलाश मुच्छल यांच्या लग्नाबाबत गेले काही दिवस सोशल मीडियावर बऱ्याच चर्चा सुरू आहेत. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी होणारा दोघांचा लग्नसोहळा अचानक स्थगित करण्यात आला. त्यानंतर सोशल मीडियावर पलाश मुच्छलबाबत विविध माहिती समोर येऊ लागली. त्यानंतर आता स्मृतीने स्वतः लग्न मोडल्याचे जाहीर केले आहे.

स्मृती व पलाश यांचा लग्नसोहळा स्थगित झाल्यानंतर स्मृतीने तिच्या इन्स्टाग्रामवरून लग्नासंबंधित फोटो, व्हिडिओ डिलीट केले होते. स्मृतीने टीम इंडियामधील तिच्या खास मैत्रिणींबरोबर साखरपुडा झाल्याची घोषणा करत एक खास व्हिडिओ शेअर केला होता, तोही स्मृतीने डिलीट केला. दोन दिवसांपूर्वी तिने एक जाहिरात व्हिडिओ शेअर केला होता. त्यामध्ये तिच्या हातात लग्नाची अंगठी नसल्याने पुन्हा चर्चांना सुरूवात झाली. शिवाय तिचा आवाज आणि चेहरा पाहून सर्वच जण तिची काळजी करत होते. यानंतर आता रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी स्मृतीने इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून पोस्ट शेअर करत लग्न रद्द झाल्याची मोठी अपडेट चाहत्यांना दिली. स्मृतीने या पोस्टमध्ये लिहिले आहे, की गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या आयुष्याबाबत अनेक चर्चा सुरू आहेत. मला वाटते, की यावेळी मी याबद्दल बोलणे महत्त्वाचे आहे. मी एक अतिशय खासगी व्यक्ती आहे आणि मी ते असेच ठेवू इच्छिते. परंतु मला हे स्पष्ट करायचे आहे, की माझे लग्न रद्द करण्यात आले आहे.

### पलाशनेही केली पोस्ट; नेमके काय म्हणाला?

मी माझ्या आयुष्यात पुढे जाण्याचा आणि त्या नात्यातून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्यासाठी सर्वांत पवित्र असलेल्या गोष्टीबद्दल बिनबुडाच्या अफवांवर लोक इतक्या सहज प्रतिक्रिया देताना पाहणे खूप कठीण गेले आहे. हा माझ्या आयुष्यातला सगळ्यात अवघड टप्पा आहे, याचा मी शांततेत शालीनतेने सामना करेन. अफवांचा कसलाही पुरावा नसतो. ज्यांचे स्रोत कधीच समोर येत नाहीत, अशा बिनबुडाच्या गॉसिपवरून एखाद्यावर टीका करण्यापूर्वी आपण विचार करावा. आपले शब्द इतरांना जखम देऊ शकतात. त्याच्या वेदना आपल्याला कधीच पूर्णपणे समजणार नाहीत. जेव्हा आपण अशा क्षुल्लक गोष्टींवर वेळ घालवतो तेव्हा जगात कितीतरी लोक अत्यंत गंभीर आणि जीवघेण्या संकटांतून जात आहेत. खोटी आणि मानहानीकारक माहिती पसरविणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करणार आहे. या कठीण काळात प्रेमाने आणि साथीने माझ्या पाठीशी उभे राहिलेल्या सर्वांचे मनापासून आभार. धन्यवाद!

# २१ व्या वर्षी आयआयटीपासून यूपीएससीचा प्रवास ठरवला

## मग मनाचा आवाज ऐकला, रुबाबदार नोकरी सोडून सूरांचा सरताज झाला आयएएस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयआयटी आणि यूपीएससी दोन्हीही भारतातील अत्यंत प्रतिष्ठित परीक्षा. एका २१ वर्षांच्या तरुणाने दोन्ही शिखरे गाठली. पण त्याच्या मनात काहीतरी वेगळेच चालले होते. शेवटी या आयएएस अधिकाऱ्याने संगीतासाठी आपली नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. कोण आहे हा आयएएस? आणि कसा होता त्यांचा हा फिल्मी प्रवास? जाणून घ्या.

भारतामध्ये यूपीएससीला आयुष्याची सर्वांत मोठी जिंक मानले जाते. या परीक्षेत यश मिळविणाऱ्यांकडे समाज वेगळ्या नजरेने पाहतो. अशा वेळी जर एखाद्याने यूपीएससीनंतरची उज्ज्वल, चमकदार कारकीर्द एका क्षणात मागे सोडली, तर ती गोष्ट चकितदेखील करते आणि प्रेरितही करते. कशिश मित्तल यांची कहाणी अशीच दुर्मीळ मिसाल आहे जेथे यशाच्या उंचीवर पोहोचूनही त्यांनी मनातील हाक ऐकली आणि अशा मार्गावर निघाले ज्याचा विचारही फार कमी लोक करू शकतात.

**लहानपणीच मिळाला सुरांचा आधार**

१९८९ मध्ये जालंधर येथे जन्मलेल्या कशिश यांच्या घरी अनुशासनासोबतच संगीताचीही परंपरा होती. वडील वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि आई संगीता मित्तल ज्यांनी त्यांना लहानपणापासूनच संगीताकडे वळविले. आठ वर्षांच्या वयात शास्त्रीय संगीताचा प्रारंभ आणि अकराव्या वर्षी हरिवल्लभ संगीत संमेलनासारख्या मोठ्या मंचावर गायन एवढ्या लहान वयातील हे यश सांगतात की संगीत त्यांच्या मनात किती खोलवर रुजलेले होते. ते सांगतात, की "माझी संगीतयात्रा तर आयएएसची कल्पना सुचेपर्यंतच सुरू झाली होती. आयआयटी आणि यूपीएससीच्या तयारीदरम्यानही संगीत माझ्यात शांत पण सामर्थ्यशाली स्वरूपात जीवंत होते." त्यांची गायकी आग्रा घराण्याशी संबंधित असून त्यांनी उस्ताद पंडित यशपाल यांच्याकडून गुरू-शिष्य परंपरेत ही कला आत्मसात केली आहे. आज ते एआयआर आणि दूरदर्शनचे 'ए-ग्रेड' कलाकार असून, आयसीसीआरचे मान्यताप्राप्त कलाकार आहेत.

### सक्सेस स्टोरी...!

**दिल्लीच्या गल्लीपासून सुरांच्या दुनियेपर्यंत**

कशिश मित्तल यांचा प्रवास एखाद्या चित्रपटाच्या कथेसारखा आहे. दिल्लीची धावपळ, सिविल सेवेची प्रतिष्ठा, आयआयटीचा गौरव हे सगळे मागे सोडून त्यांनी आपल्या खऱ्या स्वप्नाचा मार्ग पकडला. आयआयटी दिल्लीमधून कॉम्प्युटर सायन्समध्ये बी.टेक., जेईईमध्ये अखिल भारतीय सहावा क्रमांक आणि फक्त २१ व्या वर्षी आयएएस अधिकारी ही यशस्वी वाटचाल कोणालाही चकित करणारी. पण हे स्वप्न त्यांचे नव्हतेच. त्यांच्या मनात तरंगत होते तानपुऱ्याचे नाद, रियाजाची खोली आणि रागांची सुवास.

**प्रशासनिक सेवेतही गाठली शिखरे**

कशिश यांनी प्रशासनिक क्षेत्रातही प्रभावी कामगिरी केली. चंडीगडचे अतिरिक्त उपायुक्त, तवांग (अरुणाचल प्रदेश) चे उपायुक्त आणि निती आयोगात उच्च पद ते आपल्या करिअरच्या शिखरावर होते. पण त्यांच्या मनातील कलाकार आता तडजोड करत नव्हता. २०१९ मध्ये अरुणाचल प्रदेशातील बदलीनंतर त्यांनी नऊ वर्षांची सेवा पूर्ण करून राजीनामा दिला. मनात न कुठला पश्चाताप, न द्विधास्थिती. फक्त आपल्या खऱ्या मार्गाकडे वाटचाल करण्याचा आत्मविश्वास.

आयएएस सोडल्यानंतर त्यांनी तंत्रज्ञान क्षेत्रात प्रवेश केला. मायक्रोसॉफ्टमध्ये पाच वर्षे प्रिन्सिपल रिसर्च प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून काम केल्यानंतर मार्च २०२५ मध्ये त्यांनी दिशा एआयची स्थापना केली. एआय तंत्रज्ञान आणि सामाजिक प्रभाव एकत्र आणणारा एक स्टार्टअप.

**एक वायरल सूर, ज्याने लाखो लोकांना भावूक केले**

आज कशिश सोशल मीडियावरही तितकेच सहज आहेत जितके रंगमंचावर. अलीकडेच त्यांनी नुसरत फतेह अली खान यांचे "उनके अंदाज-ए-करम" हे गीत मित्रांच्या गप्पांत सहज गायिले आणि तो व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल झाला. या व्हिडिओला दोन मिलियनपेक्षा अधिक व्ह्यूज मिळाले आणि लोकांनी भावूक होऊन त्यांच्या गायकीचे कौतुक केले. कॅप्शनमध्ये त्यांनी लिहिले "वो भी अपने न हुए, दिल भी गया हाथों से।" कला आणि संस्कृतीतील त्यांच्या योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पंजाब राज्य पुरस्कार, 'नाद श्री' सन्मान, आयआयटी दिल्लीचा 'सरस्वती सन्मान', तसेच एनटीएसई आणि सीसीआरटीसारख्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती.



# दैनंदिन आहारात मटकी आरोग्याचा चवदार पर्याय



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वयंपाकघरात हमखास असणारे आणि मराठी कुटुंबात विशेष लोकप्रिय कडधान्य मटकी (मोट बीन) रोजच्या जेवणाचा महत्त्वाचा भाग बनत आहे. महाराष्ट्रासह राजस्थान, गुजरात, कर्नाटक या राज्यांत या पौष्टिक डाळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. ग्रामीण भागात ती लागतपासून थेट ताटात पोहोचते.

मटकीचे पोषणमूल्य आणि बहुगुणी फायदे

- प्रथिनांचा समृद्ध स्रोत असल्याने हे कडधान्य शाकाहारी आणि शारीरिक श्रम करणाऱ्यांसाठी फायदेशीर ठरते.
- भरपूर तंतूमुळे पचनसंस्थेचे आरोग्य राखते. बद्धकोष्ठता कमी करण्यास आणि पोट साफ ठेवण्यास मदत करते.
- लोह, कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि बी ग्रुप जीवनसत्त्वे यांचे उत्तम प्रमाण मिळते. ज्यामुळे हाडे, रक्त आणि ऊर्जा टिकते.
- हृदयासाठी सुरक्षित. कारण रक्तातील वाईट कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहतो व हृदयरोगाचा धोका कमी होतो.
- मधुमेही रुग्णांसाठी उपयुक्त. कारण मटकीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी आहे व रक्तातील साखर नियंत्रित राहते.
- प्रथिने आणि तंतूमुळे पोट भरलेल्या स्थितीत राहते. ज्यामुळे वजन नियंत्रण शक्य होते.
- शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते.
- लहान मुलांच्या वाढीसाठी उपयुक्त. अंकुरित किंवा उकडून दिल्यास पोषणमूल्य अधिक मिळते.

**मटकी खाण्याचे योग्य प्रकार आणि सूचना**

- मटकी कुठल्याही प्रकारे वापरता येते. अंकुरित, उकडलेली, थालीपीठ, मिसळ, उसळ, पावभाजी व भेळ यासारख्या पदार्थात सहज मिसळता येते.
- पचनाच्या समस्यांसाठी मटकी भिजवून, अंकुरित किंवा उकडून खावी.
- ॲलर्जीची शक्यता असल्यास तत्काळ तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.
- कच्ची मटकी शक्यतो खाऊ नये. योग्य प्रकारे शिजवून किंवा अंकुरित करून घ्यायला हवी.
- आहारात विविधता आणि संतुलन राखा. एकाच डाळीचे अतिसेवन टाळावे.

रोजच्या जेवणात मटकीचा समावेश केल्याने नैसर्गिक पोषण आणि मजबूत स्वास्थ्य मिळते. संतुलन आणि योग्य प्रकारे सेवन हाच आरोग्याचा गमक ' आहारात मटकी, आरोग्यात ताकद! '

# सेना की वर्दी में ताली क्यों नहीं बजाते फौजी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सेना की हर छोटी से छोटी चीज का बड़ा महत्व है। भारतीय सेना का हर जवान सख्त अनुशासन और मर्यादा के लिए जाना जाता है। अनुशासन और शिष्टाचार के चलते भारतीय सेना में कई नियम बनाए गए हैं। कुछ नियम ऐसे भी हैं जो आधिकारिक नहीं होने के बावजूद परंपरागत तरीके से निभाए जाते हैं। वर्दी में ताली न बजाना उन्हीं में से एक है। एसएससी, यूपीएससी, बैंक समेत कई प्रतियोगीता परीक्षाओं के जीके में सेना से संबंधित कई ट्रिकी सवाल पूछे जाते हैं। उसमें ये सवाल भी हो सकता है।

**सैन्य शिष्टाचार**

सेना की वर्दी पहने हुए फौजी को ताली बजाते हुए शायद ही देखा होगा। यह न केवल लंबे समय से चली आ रही परंपरा है बल्कि एक सैन्य शिष्टाचार बन चुका है। भारतीय सेना के जवान अगर वर्दी में है तो वह किसी कार्यक्रम में ताली नहीं बजाएंगे। यह एक ऐसा नियम है जिसका कोई रिकॉर्ड नहीं है लेकिन परंपरागत तरीके से निभाया जा रहा है।

**वर्दी में ताली क्यों नहीं बजाते फौजी?**

दरअसल, वर्दी में ताली न बजाने के पीछे एक सेना प्रमुख का निर्देश भी है। साल २०१५ में तत्कालीन सेना प्रमुख जनरल दलबीर सिंह ने एक आधिकारिक कार्यक्रम में सैनिकों को ताली नहीं बजाने का निर्देश दिया था। तत्कालीन सेना प्रमुख जनरल दलबीर सिंह ने कहा था, 'मेरा संबोधन खत्म होने के बाद, कृपया ताली न बजाएं। इसके बाद, हम वर्दी में ताली न बजाने की मर्यादा बनाए रखेंगे।' तभी से ये परंपरा इसी तरह चली आ रही है।



**नियम नहीं, फिर भी फॉलो करते हैं सैनिक**

बता दें कि वर्दी में ताली न बजाने को लेकर कोई लिखित दंडनीय नियम नहीं, लेकिन इसे आचार-संहिता का हिस्सा मानकर अनुशासन का प्रतीक समझा जाता है, न कि सख्त आदेश का पालन करना। इंडियन आर्मी यूनिफॉर्म पहनने के लिए

### सेना की वर्दी का महत्व

सेना की वर्दी एक यूनिफॉर्म से कई बढ़कर है। यह एक जवान की जिम्मेदारी, गरिमा और शपथ का प्रतीक है, जो देश के लिए निभाई जाती है। वर्दी पहनने के बाद एक फौजी आम इंसान नहीं रह जाता। उसका हर कदम पर्सनल न होकर संस्थानिक माना जाता है। इसलिए किसी प्रोग्राम में ताली बजाना भी सेना के सम्मान के खिलाफ माना जाता है।

### मिलिट्री एटीकेट

एक सैनिक कब और कैसे रिएक्ट करेगा, यह मिलिट्री एटीकेट का अहम हिस्सा होता है। इसलिए कई बार ताली बजाना या सार्वजनिक प्रशंसा करना ठीक नहीं माना जाता। खासकर राजनीतिक परिस्थितियों में। तालियां किसी वक्ता के राजनीतिक एजेंडे से जुड़े होने की इशारा कर सकती हैं, जिससे सेना का गैर-राजनीतिक रुख कमजोर हो सकता है, जो जनता के विश्वास और संवैधानिक निष्ठा के लिए महत्वपूर्ण है।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# दामिनी पथकाचा प्रेमीयुगुलांवर दंडुका

## अंबर्षी टेकडीवरील घटना; समज देऊन पालकांच्या केले स्वाधीन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– शाळा, महाविद्यालय सोडून चोपडा रस्त्यावरील अंबर्षी टेकडीवर प्रेमचाळे करणाऱ्या प्रेमीयुगुलांवर दामिनी पथकाने शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी कारवाई केली आहे. तरूण– तरूणींना समज देऊन पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून अल्पवयीन मुली, तरूण– तरूणी पळून जाण्याचे प्रमाण वाढले आहे. शाळा महाविद्यालय सोडून प्रेमीयुगुल अंबर्शी टेकडी, गलवाडे रस्ता, सानेगुरुजी स्मारक, डुबकी मारोती, शहराबाहेरील मंदिरे, शिवाजी बगीचा आदी ठिकाणी तसेच काही निर्जनस्थळी प्रेमचाळे करण्याच्या तक्रारी सातत्याने नागरिकांकडून होत होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी दखल घेतली होती. दामिनी पथकाला कारवाईचे आदेश त्यांनी दिले होते. दामिनी



पथकातील मोनिका पाटील, नम्रता जरे, श्यामल पारधी, मिलींद सोनार, गजेंद्र पाटील यांनी अंबर्शी टेकडीवर झाडा–झुडपांमध्ये प्रेम चाळे करणाऱ्या तीन प्रेमीयुगुलांवर कारवाई केली. यात गलवाडे येथील तीन मुली, दोंडाईचा येथील दोन तरुण व गडखांब येथील एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या पालकांना पोलीस ठाण्यातब बोलावून सहाही जणांना समज देऊन पालकांच्या ताब्यात दिले. या कारवाईने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

> “ आपली मुले शाळा, महाविद्यालयात केव्हा जातात. ते खरोखर शाळा, महाविद्यालयात असतात, की बाहेर कुठे गैरप्रकार करतात याबाबत पालकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आपल्या पाल्यांची नियमित चौकशी करणे गरजेचे आहे. जेणेकरून गैरप्रकारांना आळा बसेल.
> – **दत्तात्रय निकम,** पोलिस निरीक्षक.

> “ अल्पवयीन मुलामुलींना कायद्याचे ज्ञान नाही. तरुणांचे करियर करण्याचे वय आहे. चुकीची बाब पालकांना कळल्यास त्यांचे शिक्षणच बंद होण्याची भीती आहे. काही मुली नाईलाजस्तव दबावाखाली चुकीचा मार्ग निवडतात. यासाठी आधार संस्थेशी संपर्क साधावा.
> – **भारती पाटील**, अध्यक्षा, आधार संस्था.

### स्वच्छ भारत अभियानाचा बोजवारा

# शौचालय अनुदान लाटूनही सर्रास टमरेलचा वापर !

## निर्मल ग्रामसह अनेक योजना राबवूनही स्थिती ‘जैसे थे’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रजनीकांत पाटील

अमळनेर : ‘स्वच्छ भारत मिशन’ अंतर्गत गावागावांमध्ये शौचालयांसाठी प्रत्येकी १२ हजार रुपयांचे अनुदान मिळाले आहे. या योजनेंतर्गत घराघरात स्वच्छतागृहे उभी राहिली. अनेक गावांनी ‘निर्मल ग्राम’, हागणदारीमुक्त अशी पदवीही अभिमानाने मिळवली. मात्र, तालुक्यात स्वच्छता अभियानाचा बोजवारा उडाला आहे. शासकीय अनुदानावर शौचालये बांधली गेली असली, तरी ती वापराअभावी धूळखात पडून आहेत. ग्रामस्थांच्या हातात अजुनही टमरेलच दिसून येत आहेत.

गावे हागणदारीमुक्त व्हावीत, यासाठी शासनाने निर्मल ग्रामसह अनेक नवनवीन योजना राबवल्या. यासाठी कलापथकांद्वारे जनजागृती करण्यात आली. अनुदानात वाढही करण्यात आली. हागणदारीमुक्तीचे फलक लावून काही गावांना पुरस्कार देऊन सन्मानितही करण्यात आले. मात्र, बहुतांश गावांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करूनही ‘हागणदारीमुक्त गाव’ ही संकल्पना कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. शौचालयाचे बांधकाम पूर्ण होऊनही अनेक नागरिक आजही उघड्यावर शौचास जाण्यास प्राधान्य देत आहेत. यामुळे शासनाच्या अनेक योजना फेल झाल्याचे चित्र दिसत आहे. साथरोगाचा धोका वाढला, आरोग्याकडे दुर्लक्ष ! सध्या हिवाळ्याचे दिवस आहेत. उघड्यावरील शौचामुळे होणाऱ्या अस्वच्छतेतून साथरोग पसरण्याचा



धोका वाढला आहे. बहुतेक नागरिकांच्या घरी शौचालय उपलब्ध असूनही, त्याचा नियमित वापर होत नाही. रस्त्याने जाणाऱ्यांनाही दुर्गंधीचा सामना करावा लागतो. त्यामुळे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी आरोग्याचा विचार करून शौचालयाचा नियमित वापर करणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे.

**कठोर अंमलबजावणीची गरज**

हागणदारीमुक्त महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्यासाठी केवळ शौचालय बांधून उपयोग नाही. त्याचा नियमित वापर होणे महत्त्वाचे आहे. यासाठी नागरिकांचे प्रबोधन अधिक प्रभावीपणे करणे, अनुदानाचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

**शौचालये कागदोपत्री ? चौकशीची मागणी**

स्वच्छ भारत अभियानात मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाला. अनेकांनी शौचालये न बांधताच केवळ कागदोपत्र बांधकाम दाखवून परस्पर बिले उचलण्यात आल्याचे बोलले जात आहे. सोबतच अनेक ग्रामस्थ घरामध्ये बांधलेल्या शौचालयाचा वापर करत नाहीत. यामुळे शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. ‘स्वच्छ भारत मिशन’च्या अंमलबजावणीबाबत वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्हावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

**गुड मॉर्निंग पथकाची गरज**

पूर्वी उघड्यावर शौच करणाऱ्यावर गुड मॉर्निंग पथकाकडून कार्यवाही होत होती. मात्र, आता गुड मॉर्निंग पथकेच गायब असल्यामुळे अनेक नागरिक उघड्यावर किंवा रस्त्याच्याकडेला शौच करताना दिसून येतात. यामुळे शौचालयाचा वापर न करणाऱ्यांसाठी गुड मॉर्निंग पथक पुन्हा सक्रीय करून कारवाईची गरज आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरुप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



# स्वामी विवेकानंद स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलमध्ये ‘लक्ष २०२५– २६’ वार्षिक क्रीडा महोत्सव शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी उत्साहात झाला. प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. क्रीडा महोत्सवात अग्नी, आकाश, पृथ्वी व सूर्य अशा चार वेगवेगळ्या हाऊसमधील विद्यार्थ्यांनी खेळाचे उत्तम प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मार्चपास सादर करून प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. आकाशात सोडलेल्या रंगीबेरंगी फुग्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक खेळांचे उत्तम सादरीकरण केले. विद्यार्थ्यांमध्ये खेळाडूवृत्ती, शिस्त आणि उत्साह दिसून आला. याप्रसंगी स्कूलचे संस्थापक अध्यक्ष नीरज अग्रवाल, अध्यक्षा सितीका अग्रवाल, व्यवस्थापन सदस्या ममता अग्रवाल, आचल अग्रवाल, चेअरमन डी. डी. पाटील, पत्रकार किरण पाटील, चेतन राजपूत, दिनेश पालवे व अमळनेर तालुका क्रीडा समन्वयक सुनील वाघ उपस्थित होते. प्राचार्य विनोद अमृतकर यांनी मार्गदर्शन केले.

# हेमा उर्फ लता मंगेशकर...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लता दीदी सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आल्या आणि सोन्याची पळी घेऊन तोंडात ठेऊनच निघुन गेल्या. या दरम्यान त्यांनी बाराव्या वर्षानंतर काही काळ अठराविश्वे दारिद्र्य अनुभवले आहे. मात्र, नंतर त्यांच्या घरी सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र नांदल्या!

दीदींचे जन्मनाव हेमा होते. मात्र, त्यांचे वडिल (स्व.) पं. दीनानाथ मंगेशकर जे स्वतः महान शास्त्रीय गायक, नाट्य कलाकार व संगीतकार होते. त्यांच्या बळवंत नाटक कंपनीने प्रस्तुत केलेल्या ‘भावबंधन’ नाटकात ‘लतिका’ नावाचे एक पात्र होते. ते पात्र आवडल्याने व त्यापासून प्रेरीत होऊन (स्व.) पं. दीनानाथांनी हेमा हे नाव बदलून ‘लता’ नाव ठेवले.

नावात काय ? असे ‘शेक्सपिअर’ म्हटला होता. मात्र, लता मंगेशकर हे नाव जगभर विविध भाषांमध्ये उच्चारले गेले. भारतरत्न लता मंगेशकरांचा स्वर अखंड व अभंग असा होता आणि राहील! लताचा हा वेलू गेला गगनावरी!



‘ममता’ चित्रपटातील मजरूह सुलतानपुरी यांच्या गीतातून दीदी म्हणतात, की “ रहे ना रहे हम, मेहका करेंगे, बनके कली, बनके सबा, बागे वफा मे! ” संगीताच्या बागेमध्ये लतादीदींचा स्वरसुगंध हा असाच कायम दरवळत राहणार आहे!

– श्री. शरद सोनवणे, अमळनेर.
मो. ९४२०१०८३०५

# श्री मंगळ ग्रह मंदिरात रोटरी ब्लड सेंटरतर्फे रक्तदान शिबिर

## २२ दात्यांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– येथील मंगळ ग्रह मंदिरात धुळे येथील श्रीमती के. सी. अजमेरा रोटरी ब्लड सेंटरतर्फे रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले. मंगळ ग्रह सेवा संस्थेचे सेवेकरी व भाविकांचा यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. २२ दात्यांनी यावेळी रक्तदान केले.

रोटरी ब्लड सेंटरचे संचालक डॉ. संदीप चौधरी, तेजस जैन, दिनेश शिंदे, अश्विनी गवळी, वैष्णवी गिरासे यांनी रक्तसंकलन करून दात्यांना मार्गदर्शन केले. मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे रक्तदात्यांसाठी विश्रांती आदींची सोय करण्यात आली होती. सामाजिक कार्यात नेहमी तत्पर असलेल्या मंगळ ग्रह सेवा संस्था आणि रोटरी ब्लड सेंटरतर्फे आगामी काळतही विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.



ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!



जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




## दिशांची ओळख व अधिपतिदेवता

**१) पूर्व**

| | |
|---|---|
| अधिपतिदेवता | इंद्र , |
| देवतेच्या पत्नीचे नाव | शचिदेवी |
| वाहन | ऐरावत |
| आयुध | वज्र |
| द्वारपाल | नंदी व चंद्र |
| लक्ष्मीचे स्थान | ऐश्वर्य लक्ष्मी |
| अधिपत्य | पांढऱ्या रंगाचे |
| अधिपती ग्रह | सूर्य. |
| निवास स्थान | अमरावती. |
| रास | मेष व वृषभ. |

**२) अग्नेय**

| | |
|---|---|
| अधिपतिदेवता | अग्नी |
| देवतेच्या पत्नीचे नाव | स्वधा व स्वाहा. |
| वाहन | मेंढा |
| आयुध | शक्ती |
| द्वारपाल | भृंगा व पार्शददंड |
| लक्ष्मीचे स्थान | धान्य लक्ष्मी |
| अधिपत्य | तांबड्या रंगाचे |
| अधिपती ग्रह | शुक्र |
| निवासस्थान | नेत्रावती |
| रास | मिथून |

**३) दक्षिण**

| | |
|---|---|
| अधिपतिदेवता | यमराज |
| देवतेच्या पत्नीचे नाव | शामलादेवी |
| वाहन : | महिष |
| आयुध : | कालपाश दंड |
| द्वारपाल : | ऋढी व भद्र |
| लक्ष्मीचे स्थान | आदिलक्ष्मी |
| अधिपत्य | लाल रंगाचे |
| अधिपती ग्रह | मंगळ |
| निवासस्थान | संयम |
| रास | कर्क व सिंह |

**४) नैर्ऋत्य**

| | |
|---|---|
| अधिपती देवता | नैऋती |
| देवतेच्या पत्नीचे नाव | दीर्घादेवी |
| वाहन | मनुष्य |
| आयुध | खडग |
| द्वारपाल | स्कंद |
| लक्ष्मीचे स्थान | धैर्य लक्ष्मी |
| अधिपत्य | धुम्र रंगाचे |
| अधिपत्य ग्रह | राहू, केतू |
| निवासस्थान | कृष्णांगपूर |
| रास | कन्या . |

**५) पश्चिम**

| | |
|---|---|
| अधिपति देवता | वरुण |
| देवतेच्या पत्नीचे नाव | कालिका |
| वाहन | मगर |
| आयुध | पाश |
| द्वारपाल | सुभद्र गणेश व जय उमामहेश्वर |
| लक्ष्मीचे स्थान | गजलक्ष्मी |
| अधिपत्य | काळ्या रंगाचे |
| अधिपत्य ग्रह | शनि महाराज |
| निवास स्थान : | श्रद्धावती |
| रास : | तुळ व वृश्चिक |

**६) वायव्य**

| | |
|---|---|
| अधिपती देवता | वायुदेव |
| देवतेच्या पत्नीचे नाव : | अंजनादेवी |
| वाहन : | हरिण |
| आयुध | अंकुश |
| द्वारपाल | विजय |
| लक्ष्मीचे स्थान : | विजयलक्ष्मी |
| अधिपत्य : | पांढरा रंग |
| अधिपत्य ग्रह : | चंद्र |
| निवासस्थान : | गंधवती |
| रास : | धनू |

**७) उत्तर**

| | |
|---|---|
| अधिपती देवता | कुबेर |
| देवतेच्या पत्नीचे नाव | चित्रलेखा |
| वाहन | पांढरा घोडा |
| आयुध | गदा |
| द्वारपाल | वृषभ, ध्रातां |
| लक्ष्मीचे स्थान | धनलक्ष्मी |
| अधिपत्य | हिरव्या रंगाचे |
| अधिपत्य ग्रह | बुध |
| निवासस्थान | अलकावती |

**८) ईशान्य**

| | |
|---|---|
| अधिपती देवता | साक्षात भगवान शिव |
| देवतेच्या पत्नीचे नाव | पार्वती |
| वाहन | नंदी |
| आयुध | त्रिशूल |
| द्वारपाल | महाकाल, विधाता |
| लक्ष्मीचे स्थान | संतान लक्ष्मी |

अधिपत्य – पिवळ्या रंगाचे

# श्रीक्षेत्र कडगंची : दत्तगुरूंच्या पादुकांचे महत्त्व!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीनृसिंह सरस्वती महाराजांच्या मूळ पादुका तीन ठिकाणी आहेत. संन्यास घेऊन ते जेव्हा घराबाहेर पडले, तेव्हा प्रथमतः ते औदुंबर येथे आले. तेथे त्यांनी पहिला चातुर्मास करून अनुष्ठानाला प्रारंभ केला. तेथे त्यांनी आपल्या पादुका ठेवल्या. त्या पादुकांना ' विमलपादुका ' असे म्हटले जाते. विमल म्हणजे स्वच्छ, निर्मळ, शुद्ध असा भावार्थ होतो. म्हणजेच येथील अनुष्ठानापासून त्यांनी आपल्या स्वतःसाठी नव्हे, पण आम्हाला–तुम्हाला तेथील अनुष्ठानाचे महत्त्व कळावे यासाठी उपासनेतील शुद्ध, निर्मळ, स्वच्छ अशा अंतर्मनाचे स्वरूप त्यातून सूचित केले असावे. कारण अनुष्ठानासाठी सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट हीच असते. उपासनेची प्रगती ही अशा मनोधारणेतून होत असते. पुढे श्रीनृसिंहसरस्वती महाराज हे नरसोबाची वाडी येथे गेले. तेथे त्यांनी बारा वर्षे तप केले. तेथील पादुकांना ' मनोहरपादुका ' असे म्हटले गेले आहे. का म्हणाल? तर तपश्चर्येने प्राप्त होणारी प्रसन्नता तेथे अभिप्रेत असावी. जेव्हा तपश्चर्या किंवा अनुष्ठान हे अधिकाधिक काळ होते, तेव्हा ही मनाची किंवा चित्ताची प्रसन्नता मुखावर विलसत असते. दत्तगुरूंचे हे प्रसन्न दर्शन घडून येऊन आपलेही मन प्रसन्न होते. ही प्रसन्नता आनंदस्वरूपही असते. त्याचे आणखीही एक कारण असे, की स्वतः श्रीगुरूंनी सांगितले, की

' तुम्हासहित औदुंबर । आमुच्या पादुका मनोहर ।
पूजा करिती जे तत्पर । मनकामना पुरती जाणा ॥'

त्यानंतर श्रीनृसिंहसरस्वती महाराज गाणगापूर येथे आले. प्रथम त्यांनी संगमावर चोवीस वर्षे अनुष्ठान केले. राजाने त्यांना गावात येण्याची प्रार्थना केली व वाजतगाजत गावात आणले. तेथेच सध्याचा मठ आहे. श्रीशैलपर्वतास जाऊन पाताळगंगेपलीकडील कर्दळीवनात ते गुप्त झाले. पण त्यापूर्वी त्यांनी त्या मठात आपल्या पादुका ठेवल्या. त्यास ' निर्गुणपादुका ' असे म्हटले जाते. निर्गुण म्हणजे परब्रह्मस्वरूप, तसेच गुणातीत अवस्थेतील अवतारित, असाही भावार्थ आहे.

### सायंदेवांकडील ' करुणा–पादुका '

श्रीनृसिंहसरस्वती महाराज यांचे चार पट्टशिष्य होते. ते म्हणजे सायंदेव, नंदिनामा, नरहरी, सिद्धमुनी– हे होत. सिद्धमुनी हे सतत महाराजांच्या बरोबरच वावरत असल्याने त्यांना अनेक हकिकती ठाऊक होत्या. त्या त्यांनी आपले शिष्य नामधारक यांना सांगितल्या. त्यामुळे सिद्धमुनी–नामधारक संवाद डोळ्यापुढे ठेवूनच सरस्वती गंगाधर यांनी श्रीगुरुचरित्रग्रंथ लिहिला. " महाराजांनी आपल्या पादुका सायंदेव यांना पूजेसाठी दिल्या होत्या. सायंदेव त्यांची नित्य पूजा करीत असत. त्यामुळे त्या पादुका त्यांच्या कडगंची येथील घरातच ठेवलेल्या होत्या. पुढे म्हणजे तसे अलीकडे १९५५ मध्ये प. पू. श्रीगुरुनाथबाबा दंडवते महाराज कडगंचीला आले असताना त्यांच्या वंशजांनी त्यांना या पादुका दाखविल्या. त्यांनी या पादुकांचे नामकरण ' करुणापादुका ' असे केले. या पादुका सध्या देवस्थानातील श्रीदत्तात्रय यांच्या मूर्तीजवळच ठेवलेल्या आहेत. "



सत्त्व–रज–तम या त्रिगुणांपलीकडे गेलेले हे अवतारी–सत्पुरुष परब्रह्माशीच एकरूप झालेले असतात. त्यांच्या निर्गुणपादुकांची पूजा–आराधना केल्यास निर्गुण–सगुण असे दर्शन होते.

# पिंपळ झाड शास्त्रातील महिमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पिंपळ झाडाला शास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आलेले आहे. त्यामुळे त्याचा महिमा अपार मानला जातो.

१) पिंपळाचे रोपण, रक्षण, स्पर्श आणि पूजा केल्याने अनुक्रमे धन, पुत्र, स्वर्ग आणि मोक्ष प्राप्त होतो.

२) अश्वत्थाचे दर्शन घेतल्याने पापांचा नाश होतो. स्पर्शाने लक्ष्मीची प्राप्ती होते. प्रदक्षिणा केल्याने वय वाढते.

३) पिंपळाच्या झाडाची ७ वेळा प्रदक्षिणा केल्याने १० हजार गायी दान केल्याचे फळ मिळते. त्यापेक्षा जास्त प्रदक्षिणा केल्याने करोडो गायींचे दान मिळते. त्यामुळे नियमितपणे पिंपळाच्या झाडाची प्रदक्षिणा करणे फायदेशीर ठरते.

४) पिंपळाच्या झाडाला पाणी दिल्याने दारिद्र्य, दुःस्वप्न, चिंता आणि सर्व दुःखांचा नाश होतो. जो ज्ञानी पिंपळाच्या झाडाची पूजा करतो त्याने आपल्या पितरांना तृप्त केले पाहिजे.

५) माणसाला फक्त एक पिंपळाचे झाड लावल्याने इतके पुण्य मिळते, जे त्याला शंभर पुत्र झाले तरी मिळू शकत नाही. ते सर्वजण शंभर यज्ञ करतात. पिंपळाचे झाड लावल्याने माणूस श्रीमंत होतो.



६) जप, होम, स्तोत्र पठण आणि यंत्र–मंत्र इत्यादी विधी पिंपळाच्या झाडाच्या मुळाजवळ बसून केले जातात. त्या सर्वांचे फल लाखो पटीने मोठे असते. (पद्मपुराण)

७) घराच्या पश्चिम दिशेला असलेले पिंपळाचे झाड शुभ मानले जाते. (अग्नीपुराण)

८) जो व्यक्ती एक पिंपळाचे झाड लावतो त्याला एक लाख देववृक्ष (पारिजात, मंदार इत्यादी विशेष झाडे) लावण्याचे फळ मिळते. (स्कंदपुराण)

९) सर्व कार्य सिद्धीसाठी पिंपळ आणि वडाच्या मुळामध्ये दिवा लावावा.

**अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।**
**गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥**
– श्रीमद्भगवद्गीता –

# विवाह प्रतिकूल ठरतो म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विवाहाचा साखरपुडा होऊन व विवाहाचा दिवस ठरून विवाह नेमस्त झाल्यावर विवाहकार्य होईपर्यंत मध्यकाळात जर त्रयींच्या परंपरेतील म्हणजे तीन पिढ्यांतील व्यक्तीचे निधन झाल्यास तो विवाह प्रतिकूल होतो, अशी समजूत आहे. पण अशी समजूत किंवा प्रथा रूढ होताना काहीतरी घोटाळा झालेला असावा, असे वाटते. कारण साखरपुडा हा विधी अगदी अलीकडच्या शंभर–दीडशे वर्षांच्या काळात प्रचलित झालेला आहे.

वास्तविक वाङ्निश्चयानंतर उपरोक्त दुर्घटना घडल्यास विवाह प्रतिकुलत्व शास्त्राने सांगितले आहे. त्यात साखरपुडा ही संकल्पना अंतर्भूत नाही. वाङ्निश्चय हे तर विवाहाचे एक अंग असून, ते विवाहाच्या आदल्या दिवशी संपन्न होत असते. अशा वेळी उपरिनिर्दिष्ट दुर्घटना घडली तर प्रतिकुलत्व येणे तर्कसंगत आहे. पण विवाह तर सहा–सहा, आठ–आठ महिने अगोदर ठरलेले असतात.

सामाजिक घटक, कार्यालयीन तारखा इत्यादींना अनुसरून काही महिने अगोदर विवाहनिश्चिती होणे क्रमप्राप्त ठरते. अशावेळी नात्यातील (चुलत, चुलत, चुलत) कोणी दिवंगत झाल्यास तो विवाह प्रतिकूल मानून मोडणे संयुक्तिक ठरणार नाही. मात्र अगदी आई–वडील, आजोबा–आजी, पणजी–पणजा ही नाती असलेल्या व्यक्तींपैकी एखादी दिवंगत झाल्यास तो विवाह प्रतिकूल ठरत असल्यामुळे मनाला रुखरुख लागून राहते. विवाह मोडावा तर महत्प्रयासांनी विवाह जुळून आलेला असतो. अशा वेळी विनायकशांती व श्रीपूजन करून विवाह करावा. सामान्यतः अशा घटना प्रतिकुलत्व निदर्शक असतातच असे नाही, तर योगायोगाने त्या घडलेल्या असतात. पण ठरलेल्या विवाहामध्ये वरीलप्रमाणे एकामागून एक दुर्घटना घडू लागल्या, तर मात्र तो विवाह न करणे चांगले, असे मानले जाते.

सामान्यतः अशुभ सूचक घटनांबाबत निसर्गाचा असा नियम आहे, की अशुभ सूचना द्यायचीच झाल्यास ती एकदा देऊन निसर्ग (किंवा नियती) थांबत नाही, तर त्यांची तो किमान दोन तीनदा पुनरुक्ती करतो. म्हणून प्रतिकुलत्व ठरविताना अविचार व दिरंगाई कधीही करू नये.

## संतश्री संताजी जगनाडे महाराज :
# तुकोबांच्या अभंग परंपरेचे जागृत प्रहरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक महत्त्वपूर्ण संत संताजी जगनाडे महाराज यांचा ८ डिसेंबर हा दिवस जन्मदिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. भक्ती, समाजहित, सत्यनिष्ठा आणि ज्ञान यांची सांगड घालणारे संताजी हे वारकरी संप्रदायातील तेजस्वी नक्षत्र मानले जातात. आजच्या पिढीला तुकाराम महाराजांचे अभंग उपलब्ध होण्यात त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

**तुकोबांच्या शब्दांत सांगायचे तर...**
' धन्य ते संत जन, ज्यांनी केले जगाचे कल्याण'
ही ओळ संताजींच्या जीवनावर तंतोतंत लागू पडते.

**जन्म आणि प्रारंभीचे जीवन**
संताजींच्या जन्मस्थळाबाबत विविध परंपरा सांगितल्या जात असल्या, तरी अनेक ऐतिहासिक नोंदीनुसार त्यांचा जन्म ८ डिसेंबर १६२४ रोजी पुणे जिल्ह्यातील सुदुंबरे या गावात झाला. साधे कुटुंब, परंपरागत संस्कार आणि भक्तिमय वातावरण या साऱ्यांनी संताजींच्या मनावर बालपणीच भक्तीचा प्रभाव निर्माण केला. वडिलांच्या मृत्यूनंतर नातेवाईकांमध्ये वाढलेल्या संताजींनी लहानपणी कठोर परिश्रम, प्रामाणिकता आणि सहनशीलता या मूल्यांना जीवनाचा पाया बनविले.

**तुकोबांची ओवी...**
**' जोडोनिया धन ठेववे, तेवी ठेविजे मन '**
ही संताजींच्या स्वभावाला अगदी साजेशी वाटते.

**तुकाराम महाराजांचे विश्वासू शिष्य**
संताजींना जीवनाला दिशा देणारा संदर्भ म्हणजे संत तुकाराम महाराजांच्या सहवासात येण्याचा प्रसंग. कीर्तन, अभंग वाचन आणि तुकोबांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी स्वतःला पूर्णपणे सेवाभावात अर्पण केले. परंपरेत त्यांच्याबद्दल ' तुकारामांचे विश्वासू पुत्र ' असा सन्मानपूर्वक उल्लेख आढळतो. तुकोबांच्या रचनांचे लेखन करण्याची जबाबदारी ते अत्यंत निष्ठेने पार पाडत. तुकोबा रचत आणि संताजी तत्काळ ते लिहून काढत. शब्दांची शुद्धता, लय आणि भक्तिभाव जपणे हे त्यांचे अतिशय महत्त्वाचे कार्य होते. तुकारामांनी एकदा संताजींबद्दल म्हटल्याचे लोकपरंपरेत आढळते.
**' माझे बोल पेरणारा, संताजी माझा खरा पुत्र '** हा त्यांच्यावरचा गुरूचा विश्वास दर्शविणारा उल्लेख आहे.



**अभंगांची गाथा संरक्षणाचा ऐतिहासिक प्रसंग**
वारकरी परंपरेतील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे तुकाराम महाराजांच्या अभंगांचे संरक्षण. लोककथांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे तुकारामांच्या अभंगांचा विरोधकांकडून नाश केल्याचा प्रसंग घडला होता. त्या काळी लिखित साहित्याची जपणूक करणे अत्यंत कठीण काम होते. परंतु संताजींच्या विलक्षण स्मरणशक्ती, चिकाटी आणि समर्पित सेवेमुळे तुकोबांची गाथा पुन्हा पुनर्संचयित झाली. काही अभंग त्यांनी महाराजांकडून ऐकलेले, तर काही स्वतःच्या स्मरणातून पुन्हा लिहिले.
तुकोबांची ही ओवी जणू संताजींवरच लागू पडते.

**' जगाचे कल्याण, संतांच्या मनी जाण '**
यामुळे आज आपल्यापर्यंत पोहोचलेली ' तुकाराम गाथा ' ही परंपरा सुरक्षित राहिली. संताजींचे हे कार्य भक्तीइतकेच एक सांस्कृतिक संरक्षण मोहीम म्हणूनही इतिहासात अमर झाले.

**वारकरी संप्रदायातील भूमिका**
तुकाराम महाराजांच्या कीर्तन, वारी, पालख्या आणि भक्ती–चळवळींमध्ये संताजी सक्रियपणे सहभागी होत असत. ते स्वतःही उत्तम कीर्तनकार होते. लोकांना सत्य, संयम, योग्य आचरण आणि भक्तीच्या मार्गावर राहण्याचे आवाहन ते करत. समाजातील विषमता, अन्याय आणि दुर्व्यवहारांविरुद्ध त्यांनी मानवधर्माचा संदेश दिला.

**वारकरी कीर्तनात अनेकदा उच्चारला जाणारा तुकोबांचा संदेश...**
**' अभंगी सोहळा, भक्तांचा मेळा '**
हा भाव संताजींच्या प्रत्येक कार्यात दिसून येतो.
आजही वारकरी पंथात संताजींच्या परंपरेचे अनेक शिष्य आणि कीर्तनकार मानाने ओळखले जातात.

**सरकारी मान्यता, टपाल तिकीट व सरकारी कार्यालयात जयंती**
२००९ मध्ये भारतीय टपाल विभागाने संत संताजी जगनाडे महाराजांच्या स्मरणार्थ विशेष टपाल तिकीट जारी केले. यासोबतच महाराष्ट्र शासनानेही विविध विभागांना संत संताजी जगनाडे महाराज जयंती शासकीय पातळीवर साजरी करण्याचे आदेश दिले. ही संताजींच्या कार्याला मिळालेली अधिकृत आणि अभिमानास्पद मान्यता आहे.

**संताजींच्या कार्याची आधुनिककालीन प्रेरणा**
आजच्या समाजात वाढणाा स्वार्थीपणा, असहिष्णुता आणि विसंवाद पाहता संताजींचे जीवन आजही अत्यंत मार्गदर्शक ठरते.

**ते सांगतात...**
समर्पित सेवा हीच खरी भक्ती ज्ञानाचे संरक्षण हेच भविष्यासाठीची जबाबदारी. सत्य आणि प्रामाणिकतेवरूनच समाजाचा पाया मजबूत होतो. तुकोबांची अमोल शिकवणही याच अर्थाला आधार देते.
' एकतरी धरावे, भक्ती न सोडावे '
संताजींची जयंती म्हणजे केवळ स्मरण सोहळा नव्हे. तर ती भक्ती, वारकरी परंपरा आणि अभंगसाहित्याच्या मूल्यांची नव्याने जाणीव करून देणारी प्रेरणा आहे. संत संताजी जगनाडे महाराजांचे जीवन हे भक्ती, साहित्य संरक्षण, सत्यनिष्ठा आणि समाजसेवा यांचे अद्वितीय मिश्रण आहे.
तुकोबांच्या अभंगांची गाथा आजही उपलब्ध आहे, ती संताजींच्या अविरत आणि निष्ठावान कार्याचीच देणगी मानावी लागते. आजची पिढी त्यांच्या कार्याचा अभ्यास करून आपल्या सांस्कृतिक वारशाचे रक्षण करेल तेव्हाच त्यांना केलेले वंदन खरे ठरेल.

**– परेश चौधरी**
**सचिव, महाराष्ट्र प्रदेश तेली महासंघ,**
**अमळनेर.**

# देवयान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवांचा मार्ग. यज्ञातील हविर्भाग स्वीकारण्यासाठी देव ज्या मार्गाने पृथ्वीवर येतात किंवा मनुष्य मरणोत्तर ज्या मार्गाने देवलोकास जाऊन पोहोचतो असा मार्ग. सत्कर्मे करणारा मनुष्य देवत्वास पोहोचतो म्हणजे देवलोकास पोहोचतो, ही कल्पना प्राचीन काळापासून रूढ आहे. यातूनच योग्य कर्म न करणारा मनुष्य निकृष्ट स्थितीस पोहोचतो असा विचार निघतो, या स्थितीकडे जाणाऱ्या मार्गास पितृयान असे म्हणण्यात येते.

देवयानाची कल्पना ऋग्वेदात आढळत असली, तरी या मार्गाचे स्वरूप उपनिषदांत सांगितले आहे. अग्नी हा देवांना हविर्द्रव्य नेऊन देतो, अर्थात अग्नीमध्ये दहन केलेल्या मनुष्यासही तो देवयान मार्गाने देवलोकास घेऊन जातो. मृत्यूनंतर मनुष्याचा आत्मा परमात्म्याशी एकरूप होतो अथवा पुन्हा जन्म घेतो. म्हणजे त्याला कर्मानुरूप गती मिळते. छांदोग्य उपनिषदात म्हटले आहे, की जे श्रद्धापूर्वक तपाचरण करतात, त्यांचा आत्मा अग्नीच्या ज्वाळेतून दिवस, पूर्वपक्ष, उदगयन, संवत्सर, सूर्य, चंद्र, विद्युत् या क्रमाने ब्रह्मलोकास पोचतो या मार्गास देवयान असे म्हणतात.

जे कर्मकांड आचरतात त्यांचा आत्मा धुराकडून रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायन, पितृलोक, आकाश, चंद्र या मार्गाने जाऊन पुन्हा जन्म घेतो. हा पितृयानमार्ग होय. इतर उपनिषदांतही देवयान व पितृयान मार्गांचे वर्णन आढळते. उपनिषदांची ही कल्पना भगवद्गीतेने अधिक स्पष्ट शब्दांत सांगितली आहे. उपनिषदांना वर्णाश्रमधर्म, ब्रह्मज्ञान, तप, पराविद्या इत्यादी तात्त्विक गोष्टींवर भर द्यावयाचा होता म्हणून देवयानमार्गाचे हे विवेचन त्यांनी केले. अरण्यामध्ये राहून श्रद्धा व तप यांचे आचरण करतात, ते देवयानमार्गाने जातात पण जे केवळ गृहस्थधर्माचे म्हणजे कर्मकांडाचे अनुसरण करतात, ते पितृयानमार्गाने जातात. शंकराचार्यांनी उपनिषद्भाष्यांत या मार्गांना ' अर्चिरादिमार्ग ' आणि ' धूमादिमार्ग ' असे म्हटले आहे, तर ब्रह्मसूत्रभाष्यात त्यांनी देवयानमार्गास ' क्रममुक्ती ' असेही म्हटले आहे. लोकमान्य टिळकांनी देवयानपितृयान मार्गांचा संबंध उत्तरायण व दक्षिणायनाशी जोडला आहे. पृथ्वीकडून स्वर्गाकडे जाण्याच्या मार्गाची कल्पना पूर्व आशियातील अनेक देशांत सापडते.